माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १९१/२०२०**

| **तक्रारकर्ता** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| श्री. दिपक रामचंद्र होले, मु.पो. मोहपा, वार्ड क्र.१, ता. कळमेश्वर जि. नागपूर | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| | कर निरीक्षक, नगरपरिषद, मोहपा ता. कळमेश्वर जि. नागपूर | मुख्याधिकारी, नगरपरिषद, मोहपा ता. कळमेश्वर जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक २४.०२.२०२५**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. २५७७/२०१९ संदर्भात दिनांक १८.१२.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक २४.०२.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, श्री. जितेंद्र नंदकुमार नरळे व प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्री. आकाश प्रसन्न सुरजकर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. २५७७/२०१९ मध्ये दिनांक १८.१२.२०२० रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" अपिलकर्ता यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१.०५.२०१९ अन्वये सदर माहिती जास्त पृष्ठांची असल्याकारणाने अपिलकर्ता यांनी ती करविभाग, नगरपरिषद मोहपा येथे व्यक्तीगत येऊन पडताळणी करुन घेण्यास कळविले आहे. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणी दरम्यान कर विभागातून मागितलेली माहिती समाधानकारक असून अपील अर्जानुसार संबंधित माहिती पुरविण्यात आलेली आहे, असे आदेशीत केले. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांना माहितीचे प्रदान झालेले आहे. सबब, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे" असे आदेश पारीत केलेले होते.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक २३.१०.२०२० (प्राप्त दिनांक २३.१०.२०२०) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये "द्वितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी, नगर परिषद मोहपा यांनी माहिती पुरविली आहे. परंतु माहिती अधिकार अधिनियमाचे जन माहिती अधिकारी यांनी पूर्णत: उल्लंघन केलेले असून नियमबाह्य रक्कम भरणा नगर परिषद कार्यालयात जमा करण्यास भाग पाडले. माहिती अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक छायांकित प्रत २/- (दोन रुपये) दराने उपलब्ध न करुन देता प्रत्येक छायांकित प्रत ला ५०/- (पन्नास रुपये) दर लावण्यात आला आहे. सदरहु बाब नियमबाह्य आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन न दिल्यास माहिती

विनामुल्य पुरविणे आवश्यक असतांना रु. १७५०/- भरणा करण्यास भाग पाडले. अपिलकर्ता बि.पी.एल. धारक आहे, असे असून उशीरा माहिती पुरविणे व जास्त दराने माहिती पुरविणे माहिती अधिकार कायदयाचे कक्षेबाहेर येत असल्याने सदर प्रकरणाची सुनावणी घेऊन उचित न्याय प्रदान करावा, ही विनंती." असे नमुद करुन तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, आयोगाने दिनांक १८.१२.२०२० रोजी पारीत केलेल्या द्वितीय अपील क्र. २५७७/२०१९ च्या आदेशात अपिलार्थी यांना माहितीचे प्रदान झालेले असल्याने प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी आयोगास दाखल केलेल्या तक्रार अर्जात, द्वितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी, नगर परिषद मोहपा यांनी माहिती पुरविलेली आहे, असे नमुद आहे. तसेच सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी दिनांक २४.०२.२०२५ च्या पत्रान्वये आयोगास लेखी निवेदन सादर करुन त्यामध्ये "माहितीप्रमाणे मला समाधान झाले आहे. तरी मी अर्ज मागे घेत आहे" असे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणात पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नसल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** २४.०२.२०२५

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग *नागपूर*

जा.क्र. 1872 दि. 28 MAR 2025

E:\तक्रार क्र. 191/2020 होले.docx